dr pravin Aaher

Impact Factor-8.632 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## January- 2024

ISSUE No - (CDLIII) 453-A

# Social Problems in India




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive-Editors**
Dr. Rajkumar H. Mhaske
Principal
Jalna College of social work ,
Jalna

**Editor**
Dr. Renuka D. Badwane-Bhavsar
Jalna College of social work ,
Jalna

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLIII) 453-A
ISSN : 2278-9308
January 2024

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | महाराष्ट्रातील सामाजिक प्रक्रियेत वृध्दांचा सहभाग : एक अभ्यास<br>प्रा. ढोबळे गोविंद नागनाथराव , प्रा. डॉ. ए. टी. शिंदे | 1 |
| 2 | शेतकरी आत्महत्या — श्री.प्रा.डॉ.व्यंकटेश खरात | 8 |
| 3 | भारतातील दिव्यांग व्यक्तीच्या सामाजिक समस्या<br>अशोक संजाब वाठोरे , प्रा. डॉ. बालाजी पी. मुंडे | 11 |
| 4 | भारतातील बेकारीची समस्या एक संक्षिप्त आढावा<br>डॉ. जांगिड संगीता रामेश्वरलाल | 15 |
| 5 | सायबर गुन्हेगारी - विद्यार्थिनी समोरील आव्हाने<br>अविनाश गेडाम, पुष्पलता तोताराम भारसाकडे | 18 |
| 6 | किशोरवयीन मुले आणि मोबाईल एक चिकीत्सक अभ्यास<br>बाबासाहेब एल. डोंगरे, डॉ. नरसिंग पवार | 25 |
| 7 | वृध्दांना समायोजन करतांना येणा-या समस्या — प्रा.डॉ. सुनिता प्रमोद चौधरी | 29 |
| 8 | हुंडा एक सामाजिक समस्या — डॉ.प्रवीण बबनराव आहेर | 33 |
| 9 | बेकारी — हनुमान अशोकराव रासवे,प्रा. डॉ. दिपक मोहनराव बुक्तरे | 37 |
| 10 | भारतातील हुंडा पद्धती व त्यावरील प्रतिबंधात्मक तरतुदीचे अध्ययन<br>प्रा. डॉ. दिलीप घोंगडे | 42 |
| 11 | महिला सक्षमीकरण: प्रगती आणि समानतेसाठी एक उत्प्रेरक<br>प्रा. डॉ . प्रेमसिंग प्र. जाधव | 50 |
| 12 | स्पर्धा परीक्षा - स्वप्न आणि वास्तव<br>राजेश चंद्रकांत शिंदे, प्रा. डॉ. नरसिंग आबासाहेब पवार | 54 |
| 13 | सायबर क्राईम : प्रकार, कारणे व उपाय योजना — डॉ. शिंदे मीनाक्षी प्रल्हादराव | 59 |
| 14 | दारिद्रय निर्मूलनात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची भूमिका<br>तुकाराम बाबासाहेब पिठोरे,डॉ.प्रकाश तुकाराम शिंदे | 64 |
| 15 | महिलांवरील कौटुंबिक अत्याचार : कारणे, परिणाम आणि उपाय<br>जयश्री पंडितराव पोटपल्लेवार | 69 |
| 16 | मराठी साहित्य आणि वृद्धांच्या समस्या — प्रा. डॉ. दादाराव गुंडरे | 73 |
| 17 | समाजावर सोशल मीडियाच्या सकारात्मक आणि नकारात्मक प्रभावांचा अभ्यास<br>डॉ. फरिदा शफीक खान | 78 |





Scanned with OKEN Scanner

**B.Aadhar'** Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLIII) 453-A
ISSN : 2278-9308 January 2024

# हुंडा एक सामाजिक समस्या

**डॉ.प्रवीण बबनराव आहेर**
नूतन कला महाविद्यालय,राजापूर

प्रास्ताविक:-

भारतात अनेक वर्षापासून चालत आलेल्या अनिष्ट प्रथांचा भारतीय समाज जीवनावर विपरीत परिणाम होत आहे.त्यातील हुंडा ही एक समाज घातक प्रथा आहे.भारतात हुंडा देणे किंवा घेणे दोन्ही बेकायदेशीर आहे तरीपण सर्व समाज व जातींमध्ये किंवा धर्मांमध्ये हुंडा दिला किंवा घेतला जातो.प्राचीन काळापासून ही प्रथा भारतात चालत आलेली आहे. देव- देवतांच्या व राजकुमारांच्या विवाहामध्येही मौल्यवान वस्तू भेट दिल्याचे आढळून येते. समाजात हुंडा देणे घेणे हे सामाजिक प्रतिष्ठेचे मानले जाते.

उद्दिष्टे

1) हुंडा प्रमाण वाढण्याच्या कारणांचा अभ्यास करणे.
2) हुंडा प्रथेचे स्वरूप समजून घेणे.
3) लोकांचा हुंड्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन अभ्यासने.
4) समाजात हुंडा या प्रथेचा होणारा परिणाम अभ्यासणे.

भारतातील हुंडा पद्धत:-

विवाहाच्या वेळेस मौल्यवान वस्तू किंवा ठरलेली नगद रोख रक्कम प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष स्वरूपात वधू पक्षाकडून वर पक्षाला दिली जाते त्याला हुंडा असे म्हणतात .भारतात प्राचीन काळापासूनच हुंडा पद्धती अस्तित्वात आहे. आपल्या समाजात जात धर्म यानुसार खूप वेगवेगळ्या रूढी परंपरा आहेत .त्यानुसार हुंडा घेण्याच्या पद्धती ही वेगवेगळ्या आहे. पूर्वी ही पद्धत फक्त राजे महाराजे अशा श्रीमंत लोकांपुरतीच मर्यादित होती परंतु आज ही पद्धत समाजातील सर्वच स्तरांमध्ये रूढ झालेली आहे. भारतातील पुरुषप्रधान व्यवस्थेचे एक महत्त्वाचे प्रारूप म्हणजे हुंडा पद्धत होय. हिंदू धर्मशास्त्रातील कन्यादान आणि स्त्रीधन या कल्पनेतून हुंडा पद्धत भारतामध्ये रूढ झाल्याचे दिसून येते. कारण हिंदू धर्मामध्ये साळंकृत कन्यादान हे मोक्ष प्राप्तीसाठी आवश्यक असलेल्या दहा महादानांपैकी एक असल्याचे मानले जाते. त्यामुळे हिंदू धर्मातील धर्मशास्त्रात प्रथम हुंडा ही कल्पना आली.

भारतात आर्थिक दृष्ट्या गरीब असणाऱ्या कुटुंबातील मुला- मुलींसाठी ही प्रथा जीवघेणी ठरत आहे. यामुळे योग्य वयात विवाह न होणे व समाजात व्यभिचार वाढण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. हुंडा पद्धतीमुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी होऊन रसतळाला जातात. परिणामी घर, जमीन,सोने विकण्याची वेळ त्यांच्यावर येते.विवाहामध्ये ठरलेला हुंडा किंवा वस्तू देण्यास उशीर झाला तर मुलीचा छळ केला जातो. अपमानास्पद वागणूक देणे, उपाशी ठेवणे, चारित्र्यावर संशय घेणे असे प्रसंग काही दोष नसताना मुलींवर सतत येत असतात.

हुंडा प्रथेमुळे मुलींच्या जन्मावरच प्रश्नचिन्ह निर्माण होऊन गर्भपातासारखे कृत्ये समाजामध्ये केली जातात. मुलीला जन्माला येण्याआधी मारले जाते. कुटुंबात मुलगी जन्माला येणे म्हणजे एक प्रकारचे संकटच मानले जाते. आज सुद्धा समाज स्त्रीकडे एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहत आहे. समाजाची ही वृत्ती स्त्री- पुरुष समानतेसाठी घातक ठरत आहे. स्त्रीला समाजात नेहमीच कनिष्ठ वागणूक दिली जाते. तिचे स्थान दुय्यम असल्याने सतत अवहेलना केली जात

आहे. प्राचीन इतिहासाकडे पाहिले तर स्त्रीला मानाचे स्थान होते .व ती देवी- देवतांचा अंश आहे असे समजून समा तीची पूजा करत असे. परंतु काळाच्या ओघात भारतीय स्त्री जीवनाला दास्यत्व प्राप्त झाले. स्त्रियांचे जीवन समस्यांनी ग्रासलेले आहे. त्यापैकी हुंडा ही एक भीषण सामाजिक समस्या असून स्त्रियांचे जीवन उध्वस्त करत आहे. सामाजि प्रतिष्ठा म्हणून ही समस्या रूढ झाली व आज सर्वत्र ही एक सामाजिक समस्या म्हणून दिसून येते.

हुंडा देणे घेणे ही परंपरेने अस्तित्वात असलेली अनिष्ट प्रथा आहे. हुंडा प्रथेमुळे अनेक मुलींना विवाह जीवनातून बाहे पडावे लागत आहे. समाजात अनेक अडचणींना तोंड देत जीवन जगावे लागत आहे.या पद्धतीमुळे कुटुंबाची दुर्दश होणे,मुले मातेच्या प्रेमापासून पारखी होणे व वैवाहिक जीवनातून बाहेर पडलेल्या युवतींचा प्रश्न निर्माण होतो. या स समस्यांवर वचक असावा म्हणून सरकारने हुंडाबंदी कायदा तयार केला आहे.

आज भारतीय समाजामध्ये हुंडा पद्धत इतकी रूढ व गंभीर झाली आहे की या पद्धतीमुळे अनेक समाजातील मुली आत्महत्या करताना दिसून येतात. त्याचबरोबर मुलगी जन्माला आली की तिच्या लग्नाला मोठा खर्च येतो य विकृत विचारामुळे समाजामध्ये स्त्री भ्रूणहत्या, मुलीचा खून करणे अशा प्रकारच्या घटना घडत आहेत. महाराष्ट्र राज्यात दर 22 तासाला एक हुंडाबळीची घटना घडते. दर सोळा तासांनी हुंड्याशी संबंधित गुन्हा घडतो.

हुंडा पद्धतीची कारणे :-

१) जाती व्यवस्था :-

भारतातील जातीव्यवस्था हे भारतीय समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे आपला आपण विवाह करावा या नियमामुळे वधू- वर निवडीचे क्षेत्र मर्यादित आहे. साहजिकच आपल्याच जातीतील चांगला जावई मिळवण्याकरता वधू पित्यामध्ये स्पर्धा निर्माण झाल्याने जास्तीत जास्त वरदक्षिणा देण्यास वधुपक्ष तयार होतो. त्यामुळे समाजात हुंड्याचे प्रमाण वाढले आहे.

२) खोटी प्रतिष्ठा:-

समाजात आपली प्रतिष्ठा वाढावी यासाठी जास्तीत जास्त हुंडा देणे व घेणे हे मोठेपणाचे लक्षण मानले जाते. मोठेपणाच्या खोट्या कल्पनेच्या जगात वावरण्याची अनेकांना सवय असते. 'घरात नाही दाना आणि मला बाजीराव म्हणा' अशा प्रकारची कल्पना करणारे लोक जास्त हुंडा घेणे- देणे प्रतिष्ठेचे समजतात. हुंडा न देणे- घेणे हा दोन्ही पक्षांना कमीपणा वाटतो. म्हणून अशा खोट्या प्रतिष्ठेमुळेच हुंड्याचे दर वाढले आहे.

३) उच्च व श्रीमंत कुटुंबात विवाह :-

समाजात अनेक आई-वडील असा विचार करतात की आपल्या दर्जापेक्षा वरच्या दर्जात आपली मुलगी द्यावी अशी अपेक्षा करतात. त्यामुळे चांगला उच्चशिक्षित जावई मिळावा यासाठी स्पर्धा निर्माण होते.त्यामुळे वराला जास्त मागणी होऊ लागल्याने हुंडा प्रथा भारतीय समाजात गतिमान झाली आहे .

४) परंपरागत प्रथा :-

हुंडा ही प्राचीन काळापासून समाजात चालत आलेली प्रथा आहे. या प्रथेचा सर्वांनी स्वीकार केला असून जननिंदेच्या भीतीमुळे हुंड्याची प्रथा समाजात अधिक गतिमान बनत आहे. कालांतराने या प्रथेचे रूपांतर हुंडा समस्येत झाले आहे.

५) नवीन संसाराची उभारणी :-

लग्नानंतर मुलींच्या नव्या संसाराच्या उभारणीसाठी हुंड्याच्या स्वरूपात आर्थिक मदत केली जाते.मुलीला तिच्या संसारात काही कमी पडू नये म्हणून पैसे ,कपडे तसेच गृहपयोगी सर्व वस्तू देण्याची प्रथा रुढ झाली आहे. देणारे व घेणारे दोन्ही याबाबत समाधानी असल्याने सद्यस्थितीत हुंडा समस्या गतिमान होत आहे.



Scanned with OKEN Scanner

६) कुरूप मुलींचा प्रश्न :-

समाजात सगळयाच मुली दिसायला सुंदर नसतात.दुर्दैवाने काही मुली कुरुप असतात. त्यांच्या लग्नाचा प्रश्न निर्माण होतो अशा परिस्थितीत जास्तीत जास्त हुंडा देऊन कोणाच्यातरी स्वाधीन करण्याची आई- वडिलांची अपेक्षा असल्यामुळे हुंडा द्यावा लागतो .

७) भरपाईचे तत्व :-

हुंडा देणे-घेणे ही सामाजिक प्रतिष्ठा आहे.हुंडा घेतल्यामुळे कुटुंबाची प्रतिष्ठा वाढते.त्यामुळे मुलींच्या लग्नात दिलेला हुंडा खर्च भरून काढण्यासाठी मुलांच्या लग्नात दुसऱ्याकडून हुंडा घेतात.अशा दृष्टचक्रामुळे हुंड्यासारखा प्रश्न समाजात फोफावत आहे.

८) स्त्रीसाठी विवाहाची अनिवार्यता :-

विवाह पवित्र संस्कार आहे. त्यामुळे मुलगी अविवाहित असणे म्हणजे पाप समजले जाते. चारित्र्याला कलंक लागू नये या भीतीमुळे तिला कोणत्याही परिस्थितीत विवाह बंधनात टाकण्याची प्रथा समाजात रूढ झाली आहे.म्हणून आई-वडील हुंडा देऊन आपल्या मुलीच्या विवाहाच्या जबाबदारीतून मुक्त होतात .

- हुंडा बंदी साठी उपाययोजना-

१) हुंडाबंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी -

भारतात 30 मे 1961 रोजी भारत सरकारने हुंडाबंदी कायदा केला.2 ऑक्टोबर 1985 मध्ये त्यात सुधारणा करून त्याची अंमलबजावणी केली. गुन्हेगाराला पाच वर्षाची सक्षम कारावासाची शिक्षा व १५ हजार रुपये दंड आकारण्यात आला. पण प्रत्यक्ष हुंडाबंदी असून सुद्धा हे व्यवहार आज सर्रास गुप्तपणे होत आहेत.हुंडा देणारा व घेणारा हुंड्याची रक्कम गुप्तपणे घेतो.त्यामुळे त्या गोष्टी लिखित स्वरूपात नसतात. त्यामुळे कायद्याच्या कक्षेतून अशा प्रकारच्या गुन्हेगारांची आपोआप सुटका होते.

२) मुला-मुलींना जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य देणे -

मुला-मुलींसाठी आई वडीलच जोडीदार निवडतात. पूर्वी तर हे प्रमाण खूप मोठे होते. जर जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य मुलांना दिले तर स्वतःच्या भविष्याचा विचार करून ते योग्य निर्णय घेतील.त्यामुळे हुंड्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही.

३) हुंडा विरोधी चळवळ -

समाजात विविध सेवाभावी संस्था व महिला संघटनांनी पुढाकार घेऊन हुंडाविरोधी चळवळ उभी करून समाज जागृती करावी.मी स्वतः हुंडा घेणार नाही व हुंडा देणार नाही अशी प्रबोधनाच्या माध्यमातून युवक व युवतींची मानसिक स्थिती तयार केल्यास हुंडा प्रथेस पायबंद बसण्यास मदत होईल.

४) आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे -

मर्यादित समाजातून विवाहाचा जोडीदार निवडताना काही मर्यादा येतात.क्षेत्र मर्यादित असते. पारंपारिक समाजामध्ये समाज बंधणे खूप होती. जोडीदार हा स्वतःच्या जातीतीलच शोधावा लागत असे.समाजाने आंतरजातीय विवाहाचा बदलता दृष्टिकोन स्वीकारून या विवाहाला प्रोत्साहन दिले पाहिजे. भविष्यात मुले- मुली स्वतःच्या भविष्याचा विचार करून स्वतःचा जोडीदार स्वतः निवड तील त्यामुळे हुंड्याचा प्रश्न येणार नाही.

५) प्रेम विवाहाचे समर्थन करणे -

उच्च शिक्षण नोकरी व व्यवसायाच्या माध्यमातून घराबाहेर पडलेल्या मुला-मुलींचे प्रेम संबंध जुळून येतात व त्याचे रूपांतर विवाहात होत असेल तर जातीपातीचा विचार न करता त्यांना जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य द्यावे.असे



Scanned with OKEN Scanner

झालेले विवाह कुटुंब आणि समाजाने मान्य करावे.त्यांना जातीतून बहिष्कृत करण्याचे कृत्य करू नये व प्रेमविवाहास प्रोत्साहन द्यावे.

समारोप -

अशाप्रकारे हुंडा देणे घेणे ही अनिष्ट प्रथा असून हुंडा पद्धतीमुळे समाजाला अनेक दुष्परिणामांना सामोरे लागते.हुंडा प्रथेमुळे कर्जबाजारीपणा, घटस्फोट,आत्महत्या, स्त्री भ्रूणहत्या व कौटुंबिक हिंसाचार इत्यादी परिणाम भारतीय समाज व्यवस्थेवर होत आहेत.

संदर्भ-

१) डॉ.दा.धो. काचोळे -भारतीय समाज प्रश्न आणि समस्या-विद्या बुक्स पब्लिकेशन,औरंगाबाद.
२) डॉ. प्रदीप आगलावे- भारतीय समाज- प्रश्न आणि समस्या
३)डॉ.बी.पी.पवार-हुंडा एक समस्या- आव्हाने व उपाय
४) हुंडा परंपरा नव्हे बाजारीकरण, मुंबई -2003
५) इंटरनेट, दैनिके ,मासिके

Karmaveer Pratishthan's Jalna

# Jalna College of Social Work, Ramnagar, Jalna

NAAC Accredited with ' B ' Grade

One Day National Conference 16 January 2024

## Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Chattrapati Sambhajinagar

## " Social Problems in India "

# Certificate

*This is to certify that Prof./Dr./Mr./Mrs.* Pravin Babanrao Aher ............

*of* Nutan Art's College, Rajapur, Tal-Sangamner ............ *Has attended/Participated*

*of as a Resource person / Chairperson / Delegate / Guest of Honour / Presented a Paper entitled* ............

Dowry is a social Problem. ............

*in one day National Conference on* **" Social Problems in India "**

*held on 16th January 2024*

| | | | |
|---|---|---|---|
| Dr. Renuka D. Badvane (Bhavsar) | Dr. Narsing A. Pawar | Dr. Deepak M. Buktare | Dr. Rajkumar Mhaske |
| Convener | Convener | Convener | Principal |

Scanned with OKEN Scanner